बुधवार, दि २० नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ९ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे आणि लोकशाहीने दिलेला हा आपला अधिकार आहे. त्यामुळे

## चला मतदान करूया, आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावूया

# माझं मत माझा अधिकार



तुमचे अमुल्य मत
**तुमचा विकास घडवेल**
लोकशाहीला बळकट करेल

**आमचे वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांच्यासह सर्व मतदार जनतेस आवाहन आहे की, येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान अवश्य करा...**

**-संपादक, युवा आदर्श**




## एक नैतिक मतदार व्हा...

निवडणुकीत लाच घेणे आणि लाच देणे अपराध आहे. मतदानासाठी पैसे, मद्य किंवा मोफत भेटवस्तू यांचा समावेश लाचेमध्ये होतो.

cVIGIL

सीविजील मोबाईल अॅप डाऊनलोड करा, गैरव्यवहाराच्या घटना नोंदविण्यासाठी छायाचित्र/व्हिडीओ क्लिक करुन अपलोड केल्यास भरारी पथक हे कार्यवाही करण्यासाठी ऑटो लोकेशनच्या मदतीने त्वरीत घटनास्थळी पोहचतील.

# संपादकीय

## फ्लाईंग शीख मिल्खा सिंग

भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांची आज जयंती. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत त्यांनी सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांच्या पत्नीचेही नुकतेच कोरोनाने निधन झाले आहे. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे प्रमुख पाकिस्तानचे माजी प्रमुख आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले ही स्पर्धा पाहण्यासाठी आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धेनंतरच आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकारनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला या चित्रपटात फरहान अखतर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे दोन वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले त्यांच्या त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. मिल्खा सिंग यांना जयंतीदिनी विनम्र आदरांजली!

**श्याम बसप्पा ठाणेदार,**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षकांची आयोगाकडून नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२-बदनापूर(अ.जा.) व १०३-भोकरदन विधानसभा मतदारसंघात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ च्या अनुषंगाने बुधवार दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान तर दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. निवडणुकीच्या मतमोजणी प्रक्रियेसाठी भारत निवडणूक आयोगाच्यावतीने पाचही विधानसभा मतदारसंघनिहाय मतमोजणी निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. अशी माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

भारत निवडणूक आयोगाकडून नियुक्त केलेले मतमोजणी निरीक्षक दि. २१ नोव्हेंबर २०२४ रोजी संबंधित विधानसभा मतदारसंघात दाखल होणार आहेत. भारत निवडणूक आयोगाच्यावतीने ९९-परतूर विधानसभा मतदारसंघाकरीता श्री.नवीन (भा.प्र.से.), १००-घनसावंगी विधानसभा मतदारसंघाकरीता राजीव शुक्ला (एस.सी.एस.), १०१-जालना विधानसभा मतदारसंघाकरीता भारतीय प्रशासकीय सेवेतील २००८ बॅचचे उत्तर प्रदेश कॅडरचे डॉ. वेद पती मिश्र (भा.प्र.से.), १०२-बदनापूर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघाकरीता राजीव रंजन (एस.सी.एस.), १०३-भोकरदन विधानसभा मतदारसंघाकरीता श्रीमती रिचा (एस.सी.एस.) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतमोजणी शनिवार दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजता सुरु होणार आहे. ९९-परतूर विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी अंबा-परतूर येथील पी.एम.श्री.जवाहर नवोदय विद्यालय, १००-घनसावंगी विधानसभा मतदारसंघाची घनसावंगी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, १०१-जालना विधानसभा मतदारसंघाची जालना येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, १०२-बदनापूर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघाची बदनापूर येथील कृषि महाविद्यालयात आणि १०३-भोकरदन विधानसभा मतदारसंघाची भोकरदन येथील नगर परिषद मंगल कार्यालयाच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे. असेही कळविले आहे.

# मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी मतमोजणी आवश्यक - तुषार गांधी

**जळगाव -** भारतात निवडणुका दीर्घ स्वरूपात घेणे व काही दिवसांच्या अंतराने मतमोजणी करणे यावर निवडणूक आयोग जोर देत असतो मात्र यातून लोकशाही कमकुवत होत जाते , सत्ताधारी याचा गैरफायदा घेत असतात , मतदाराच्या मताचे अवमूल्यन होते तेंव्हा मतदानातील गैरप्रकार टाळण्यासाठी मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी मतमोजणी आवश्यक आहे असे प्रतिपादन महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांनी केले.



भारत जोडो अभियान व सिव्हिल सोसायटी तर्फे दिनांक १८ नोव्हेंबर रोजी गणेश कॉलनी , जळगाव येथे आयोजित पत्रकार परिषदेत गांधी बोलत होते .

पत्रकार परिषदेस संबोधित करतांना गांधी यांनी सांगितले की आज देशात संविधान धोक्यात आहे , मोठ्या प्रमाणात दहशत निर्माण केली जात आहे , मुलींची सुरक्षितता धोक्यात आहे , जातीय , धार्मिक तेढ वाढविली जात आहे , एकाच उद्योगपतीच्या हितासाठी साऱ्या देशाला वेठीस धरले जात आहे , महाराष्ट्राला कंगाल करून इथले विविध उद्योग गुजरातला नेले जात आहे हे थांबविण्यासाठी आता मतदारांनी जबाबदारीने मतदान करणे आवश्यक आहे .

बटेंगे तो कटेंगे हा नारा दहशतीस पोषक असून जनतेत भय निर्माण होत आहे या वरून भाजपला नेमके काय करायचे आहे याचा अंदाज येतो या घोषणेने जाती जातीत , धर्मा धर्मात संघर्ष पेटला तर ते कुणालाही परवडणारे नाही असेही तुषार गांधी यांनी स्पष्ट केले . जे भाजप विरुद्ध बोलतात त्यांना हे सरकार नक्षली , देशद्रोही म्हणून संबोधतात , या देशात विरोधक नसावेत असे त्यांना वाटते . राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेतून जे यश संपादन केले त्यामुळे हे सरकार घाबरून गेले आहे तेंव्हा मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करून या सरकारला धडा शिकवावा असेही गांधी यांनी स्पष्ट केले.

मंचावर तुषार गांधी यांचे समवेत जेष्ठ साहित्यिक जयसिंग वाघ होते त्यांनी भारतातील एकूण परिस्थिती अतिशय भयावह असून देशात बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे , भांडवलशाही व ब्राम्हणशाही विकसित होत असून लोकशाहीची गळचेपी होत आहे , धार्मिक अराजकता वाढवून देशात यादवी घडविण्याचा घाट घातला जात आहे असे सांगितले .

ज्येष्ठ समाजसेविका वासंती दिघे यांनी महिलांची सुरक्षितता धोक्यात आलिअसल्याचे सांगून देशात सर्वच स्वायत्त संस्था सरकारचे प्रतिनिधी असल्यागत वागत आहे , मतदारांची दिशाभूल करून मते मिळविली जात आहेत असे सांगितले .

सिव्हिल सोसायटीचे संयोजक अमोल कोल्हे , फाईम पटेल , सतीश सुर्वे , प्रा. दिलीप भारंबे , आर. ए. पाटील , दिलीप जोशी ई. कार्यकर्ते हजर होते .

# छत्रपती संभाजीनगर येथील तज्ज्ञ डॉ. जयपाल आर. घुणावत यांची आस्था हॉस्पिटल जाफराबाद येथे रुग्ण तपासणी

**जाफराबाद -** छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध मेंदू, मणका व पॅरालिसिस विकार तज्ञ डॉ. जयपाल घुणावत यांनी ग्रामीण जनतेसाठी जाफराबाद महिन्यातील एक दिवस दि.२० नोव्हेंबर बुधवार ला रुग्णसेवा आयोजित केलेले आहे. डॉ. घुणावत ग्रामीण भागातून उच्चशिक्षित झालेले असून त्यांचे शिक्षण एमबीबीएस, डी.एन.बी, डी.एम. न्यूरोलॉजी झालेले आहे. तसेच भारतातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळवलेला आहे. ग्रामीण समाजाची जाण असलेले डॉ. घुणावत हे सदैव रुग्णसेवेसाठी तत्पर असतात. तसेच रुग्णांचे पूर्णतः समाधान-निदान करत असतात. छत्रपती संभाजीनगर येथे डॉ. घुणावत यांचे ग्लोबल न्यूरोलॉजी सेंटर हॉस्पिटल आहे. ते मेडिकव्हर मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल येथे कार्यरत आहेत. आतापर्यंत मेंदू, मणका व पॅरालिसीसशी संबंधित अनेक रुग्णांना त्यांनी मागील पंधरा वर्षापासून सेवा देत निदान केलेले आहे. नुकतेच काही दिवसांपूर्वी डॉ. घुणावत यांनी मेंदूच्या दुर्मिळ आजारावर उपचार करून रुग्णांना बरे केलेले आहे. त्यामुळे त्यांना सन्मानपत्र व सत्कार करून गौरविण्यात आलेले आहे.



दिनांक २० नोव्हेंबर बुधवार ला जाफराबाद येथे डॉ.सदानंद सोळंके सरांचे आस्था हॉस्पिटल, शिवनेरी बिल्डींग, अहिल्यादेवी होळकर चौक, जाफराबाद येथे रुग्ण तपासणी करण्याचे ठरविले आहे. तरी सर्व नागरिकांनी व रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# आज मतदान; राज्यातील ४१३६ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात होणार बंद

मुंबई - गेल्या दोन-तीन आठवड्यांपासून चालू असलेल्या नेत्यांच्या प्रचारतोफा सोमवारी (१८ नोव्हेंबर) थंडावल्या. आरोप-प्रत्यारोपाने नेत्यांनी मैदाने गाजवली. आता महाराष्ट्र विधानसभा निवडणूक आज बुधवार ( दि २०) रोजी पार पडणार आहेत. ही निवडणूक आत्तापर्यंत झालेल्या सर्व निवडणुकांपेक्षा वेगळी आहे. कारण यावेळी सहा प्रमुख पक्ष निवडणुकीच्या मैदानात आहेत. तसेच महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा थेट सामना रंगणार आहे. इतरही लहान पक्ष या निवडणुकीत असून त्यांची भूमिका देखील महत्त्वाची असली तरी मविआ व महायुतीत सत्तेसाठीची चुरस आहे. या निवडणुकीत काय होणार? मतदान किती टक्के होणार? जनता कुणाला झुकतं माप देणार? या आणि अशा सगळ्या महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे शनिवार (दि २३) रोजी निवडणुक निकालानंतर मिळणार आहेत. दरम्यान, बुधवारी सकाळी सात वाजता मतदानाला सुरुवात होईल. यावेळी मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी निवडणूक आयोगाने वेगवेगळे प्रयत्न केले आहेत. त्यांच्या प्रयत्नांना किती यश मिळतं ते बुधवारी सायंकाळी स्पष्ट होईल. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत एकूण ६१.४% मतदानाची नोंद झाली होती. राज्यात सहा महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणुकीत ६६ टक्के मतदान झाले होते.

राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघात आज मतदान होत आहे. राज्यात एकूण ४१३६ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद होणार आहे. आज सकाळी ७ वाजल्यापासून मतदान होणार असून ते संध्याकाळी ६ वाजता बंद होणार आहे. मतदानासाठी १२ प्रकारचे ओळखपत्रं ग्राह्य धरले जातील असं निवडणूक आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. शनिवारी, २३ नोव्हेंबर रोजी मतदानाचा निकाल जाहीर होणार आहे.

गेल्या महिनाभरापासून राज्यात प्रचाराचा धुरळा उडाला असून सत्तेच्या चाव्या आपल्याकडेच राहाव्यात यासाठी महायुती प्रयत्नशील आहे. तर लोकसभेच्या निकालानंतर आत्मविश्वास वाढलेल्या महाविकास आघाडीने सत्ता परत मिळवण्यासाठी कंबर कसल्याचं दिसून येते. काही तुरळक अपवाद वगळता राज्यात कोणतीही अनुचित घटना झाली नाही. आज मतदानाचा दिवस आहे.

आज सकाळी ७ वाजेपासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदानाची वेळ आहे. राज्यातील ९.७ कोटी मतदार यंदा मतदानाचा हक्क बजावतील. त्यासाठी राज्यातील १ लाख ४२७ मतदान केंद्र सज्ज झाली आहेत. त्यापैकी मुंबईत एकूण २५३८ मतदान केंद्रांवर मतदान होत आहे.

प्रदेशनिहाय जागा खालीलप्रमाणे,

पश्चिम महाराष्ट्र - ७० जागा, विदर्भ - ६२, मराठवाडा - ४६, कोकण ठाणे - ३९, मुंबई - ३६, उत्तर महाराष्ट्र - ३५.

## परतूर : मतदान अधिकारी रवाना

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी दि. २० मतदान होणार असून निवडणूक निर्णय अधिकारी पद्माकर गायकवाड, सहाय्यक निवडणूक अधिकारी तहसीलदार डॉ.प्रतिभा गोरे, सोनाली जोंधळे यांच्या प्रमुख उपस्थितीत निवडणूक अधिकारी, कर्मचाऱ्यांना मंगळवारी दि.१९ रवाना करण्यात आले. दरम्यान, या मतदारसंघात एकूण ३ लाख २३ हजारावर मतदार असून ३५९ मतदान केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.



परतूर शहरालगत असलेल्या जवाहर नवोदय विद्यालयाच्या सभागृहात विधानसभा निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना बॅलेट युनिट,कंट्रोल युनिट,व्हिव्हीपॅट मशीन व मतदानासाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य मंगळवारी दि. १९ पुरविण्यात आले. त्यानंतर मतदान केंद्रावर जाण्यासाठी उपलब्ध करण्यात आलेल्या गाड्यांमधून निवडणूक निर्णय अधिकारी पद्माकर गायकवाड, सहाय्यक निवडणूक अधिकारी डॉ.प्रतिभा गोरे, सोनाली जोंधळे,नायब तहसीलदार संजय चंदन,विनोद भालेराव,संजय शिंदे,लक्ष्मीकांत खळीकर, कुलदीप कुलकर्णी,दिलीप कुलकर्णी,बोलचेटवार, दादामियाँ पठाण, कल्याण काळदाते, व्यंकट धंदेवाड, संतोष पवार, संजय कास्तोडे, जावेद पठाण, ज्ञानेश्वर ढवळे,कृष्णा सोनवणे यांच्यासह निवडणूक अधिकारी,कर्मचारी महसूल कर्मचारी उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांनी केली रामनगर येथील मतदान केंद्राची पाहणी

**जालना -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि पोलीस अधिक्षक अजयकुमार बसंल यांनी आज जालना विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्राना मतदानाच्या पुर्व संध्येला भेट देवून पाहणी केली. यावेळी डॉ. पांचाळ यांनी जालना विधानसभा मतदारसंघातील रामनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मतदान केंद्रास भेट दिली. तसेच मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात आलेले मतदान केंद्राध्यक्ष व इतर कर्मचाऱ्यांशी संवाद साधून निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मतदान केंद्रावर कार्यवाही पार पाडण्याच्या यावेळी सूचना दिल्या. यावेळी पोलीस अधिक्षक अजयकुमार बंसल, उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांची उपस्थिती होती.

### विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

## जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षकांची आयोगाकडून नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२-बदनापूर(अ.जा.) व १०३-भोकरदन विधानसभा मतदारसंघात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ च्या अनुषंगाने बुधवार दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान तर दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. निवडणुकीच्या मतमोजणी प्रक्रियेसाठी भारत निवडणूक आयोगाच्यावतीने पाचही विधानसभा मतदारसंघनिहाय मतमोजणी निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. अशी माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

भारत निवडणूक आयोगाकडून नियुक्त केलेले मतमोजणी निरीक्षक दि. २१ नोव्हेंबर २०२४ रोजी संबंधित विधानसभा मतदारसंघात दाखल होणार आहेत. भारत निवडणूक आयोगाच्यावतीने ९९-परतूर विधानसभा मतदारसंघाकरीता श्री.नवीन (भा.प्र.से.), १००-घनसावंगी विधानसभा मतदारसंघाकरीता राजीव शुक्ला (एस.सी.एस.), १०१-जालना विधानसभा मतदारसंघाकरीता भारतीय प्रशासकीय सेवेतील २००८ बॅचचे उत्तर प्रदेश कॅडरचे डॉ. वेद पती मिश्र (भा.प्र.से.), १०२-बदनापूर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघाकरीता राजीव रंजन (एस.सी.एस.), १०३-भोकरदन विधानसभा मतदारसंघाकरीता श्रीमती रिचा (एस.सी.एस.) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतमोजणी शनिवार दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजता सुरु होणार आहे. ९९-परतूर विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी अंबा-परतूर येथील पी.एम.श्री.जवाहर नवोदय विद्यालय, १००-घनसावंगी विधानसभा मतदारसंघाची घनसावंगी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, १०१-जालना विधानसभा मतदारसंघाची जालना येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, १०२-बदनापूर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघाची बदनापूर येथील कृषि महाविद्यालयात आणि १०३-भोकरदन विधानसभा मतदारसंघाची भोकरदन येथील नगर परिषद मंगल कार्यालयाच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे. असेही कळविले आहे.

## जननायक बिरसा मुंडा

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरिक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले. एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला.

**- श्याम ठाणेदार**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

## मतदान केंद्रावर वेब कास्टींगद्वारे निवडणूक विभागाची राहणार करडी नजर- जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी** - विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी आज (दि.२०) रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील ९९१ मतदान केंद्रावर बाहेर आणि आत मध्ये १ हजार ९८२ वेब कास्टींग कॅमेरे बसविण्यात आले आहे. या वेब कॅमेऱ्याद्वारे जिल्हा निवडणूक विभाग हे जालना शहरातील सर्व मतदान केंद्रावरील सर्व हालीचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येणार आहे. वेबकास्टिंग करण्यात आलेल्या मतदान केंद्रावर मतदारांच्या मतदान गोपनियतेचा भंग होणार नाही, अशा पद्धतीने एक कॅमेरा बसविण्यात आली आहे. या कॅमेऱ्याच्या सहाय्याने केंद्रावर मतदान सुरू होण्यापासून संपेपर्यंतच्या सर्व हालचालींवर नजर ठेवण्यात येणार आहे. तसेच मतदान केंद्रात सुरू असलेली मतदान प्रक्रिया, मतदान केंद्रावरील उपलब्ध सोयीसुविधा आदीवर वेबकास्टिंगच्या माध्यमातून निवडणूक विभाग लक्ष ठेवणार आहे. वेब कास्टींद्वारे होणारे चित्रण थेट निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, भारत निवडणूक आयोग यांना देखील पाहता येणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले. याकरीता येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियंत्रण कक्ष (वॉर रुम) स्थापन करण्यात आली असून, जालना जिल्ह्यातील ९९१ मतदान केंद्रावर वेबकास्टींगद्वारे मतदान केंद्रावर करडी नजर राहणार असल्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पांचाळ यांनी माहिती दिली आहे.





